आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.१० वाजता
१२ मे २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पाकिस्तानच्या नुकसानासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याची एअर मार्शल ए के भारती यांची स्पष्टोक्ती

- देशभरात आज बुद्धपौर्णिमा साजरी, विविध ठिकाणी बुद्धवंदनेचं आयोजन

- राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं घेतलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या दुपारी जाहीर होणार

- भारत-पाकिस्तान दरम्यान शस्त्रसंधी झाल्यानंतर आज भारतीय शेअर बाजारांमध्ये तेजी

**आणि**

- खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र ८० पदकांसह अव्वल स्थानी कायम

**<><><><><>**

पाकिस्तानी सैन्याने दहशतवाद्यांना साथ देण्याचा निर्णय घेतला, भारताला त्याचा प्रतिकार करणं गरजेचं होतं, त्यामुळे पाकिस्तानच्या नुकसानासाठी ते स्वतःच जबाबदार आहेत, अशी स्पष्टोक्ती एअर मार्शल ए के भारती यांनी केली आहे. तिन्ही संरक्षण दलाच्या वार्ताहर परिषदेत ते आज नवी दिल्ली इथं बोलत होते.

भारतीय हवाई दलानं पाकिस्तानचे अनेक अग्नीबाण आणि क्षेपणास्त्रं हाणून पाडले. पाकिस्तानचा हल्ला रोखण्यात भारताला यश आलं असं त्यांनी सांगितलं. भारताची सुरक्षा व्यवस्था अभेद्य होती, ती भेदणं पाकिस्तानला  अशक्य होतं, असं भारती म्हणाले. पाकिस्तानच्या हल्ल्यात भारताचं कमीत कमी नुकसान झालं, असं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथे उच्चस्तरीय बैठक होत आहे. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान, तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख आणि अनेक वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित आहेत.

दरम्यान, भारत आणि पाकिस्तान यांच्या सैन्यदलाच्या डीजीएमओ मधलं आज दुपारी १२ वाजता नियोजित असलेलं संभाषण आज संध्याकाळी होणार असल्याचं वृत्त आहे.

<><><><>

जम्मू काश्मीरच्या सीमावर्ती भागात, सीमेवर तसंच देशातल्या आंतरराष्ट्रीय सीमेवर काल रात्रीपासून आज पहाटेपर्यंत सर्वत्र शांतता होती, असं भारतीय लष्करानं म्हटलं आहे. पाकिस्तानकडून कुठेही हल्ले किंवा चिथावणीखोर हालचालींचं वृत्त नाही.

<><><><>

भारत आणि पाकिस्तान यांच्यात निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर नागरी उड्डाणांसाठी बंद केलेली ३२ विमानतळ आता सुरू झाली आहेत. भारतीय विमानतळ प्राधिकरणानं आज पत्रकाद्वारे ही माहिती दिली. याबाबतची अद्ययावत माहिती मिळवण्यासाठी प्रवाशांनी थेट विमान कंपन्यांशी संपर्क साधावा, असंही प्राधिकरणानं सांगितलं आहे.

<><><><>

भारतीय सैन्यानं ज्या ताकदीनं आणि अचूकतेनं ऑपरेशन सिंदूर राबवलं ते अभूतपूर्व असून राज्य सरकार संरक्षण दलांसोबत अधिक समन्वयानं काम करेल, असं मुखमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. भारत आणि पाकिस्तान

दरम्यानच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर संरक्षण दल आणि राज्य सरकार यांची संयुक्त बैठक आज वर्षा या निवासस्थानी झाली त्यावेळी ते बोलत होते. राज्यातल्या सुरक्षेवर आणि सज्जतेवर झालेल्या या बैठकीत गुप्तचर माहितीचं आदानप्रदान झालं. तंत्रज्ञानाचा अधिक वापर आणि यापुढे घेण्याच्या खबरदारीबद्दल, तसंच संरक्षण दलांना राज्य सरकारतर्फे अपेक्षित सहकार्य आणि अधिक गतिमान समन्वय यंत्रणा उभारण्यावर बैठकीत चर्चा झाली. मुंबईची सुरक्षा तसंच सायबर सुरक्षेबाबत घेण्याच्या खबरदारीबद्दल बैठकीत विशेष चर्चा झाली .

या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, तसंच लष्करी अधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

देशभरात आज बुद्धपौर्णिमा साजरी केली जात आहे. बिहारमध्ये बुद्धगया इथं थायलंड, व्हिएतनाम आणि म्यानमार या देशांमधून लाखो भाविक बुद्धजयंतीनिमित्त दाखल झाले आहे. यानिमित्तानं महाबोधी मंदिरात विशेष प्रार्थनेचं आयोजन करण्यात आलं होतं. नागपूर जिल्ह्यात कामटी इथल्या ड्रॅगन पॅलेस टेम्पल इथंही आज विशेष बुद्ध वंदना आयोजित करण्यात आली होती. कोल्हापुरात विविध सामाजिक शैक्षणिक संस्था संघटनांनी भगवान बुद्धांच्या पुतळ्याला तसंच प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. तर बीड जिल्ह्यात अंबाजोगाई शहरासह ठिकठिकाणी धम्म रॅली काढण्यात आली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बुद्धपौर्णिमेनिमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. सत्य, समानता आणि सौहार्द या तत्वांवर आधारित भगवान बुद्धांची शिकवण मानवतेसाठी मार्गदर्शक असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारत-पाकिस्तान दरम्यान शस्त्रसंधी झाल्यानंतर आज सकाळी भारतीय शेअर बाजारांमध्ये तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स अडीच हजारांहून अधिक अंकांनी वधारला तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमध्येही ८००हून अधिक अंकांची वाढ दिसून आली. परकीय गुंतवणूकदारांनी केलेली गुंतवणूक आणि जागतिक पातळीवरचे सकारात्मक संकेत यांमुळे ही वाढ दिसून आल्याचं तज्ञांचं म्हणणं आहे.

<><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या, इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल, उद्या दुपारी १ वाजता जाहीर होणार आहे, असं मंडळाच्या अधिकृत पत्रकात म्हटलं आहे. विद्यार्थ्यांना त्यांचे विषयनिहाय गुण, मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर पाहता येतील.

<><><><>

परदेशी गुंतवणूकदार संस्थांनी भारतीय शेअर बाजारात चालू महिन्यात १४ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली आहे. डिपॉझिटरीच्या आकडेवारीनुसार परदेशी गुंतवणूकदारांनी ९ मे पर्यंत शेअर बाजारात १४ हजार १६७ कोटी रुपयांची गुंतवणूक केली. सोबतच या गुंतवणूकदारांनी ३ हजार ७२५ कोटी रुपये काढून घेतले आहेत. एप्रिल महिन्यात झालेल्या ४ हजार २२३ कोटी रुपये गुंतवणुकीनंतर शेअर बाजाराला सकारात्मक गती मिळाली आहे.

<><><><>

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत ८० पदकांची लयलूट करत महाराष्ट्रानं पदकतालिकेतलं आपलं अव्वल स्थान कायम ठेवलं आहे. यात ३० सुवर्ण आणि २५ रौप्यपदकांचा समावेश आहे. स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच महाराष्ट्र पदकतालिकेत पहिल्या क्रमांकावर आहे. कर्नाटक ४२ पदकांसह दुसऱ्या तर राजस्थान २४ पदकांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. खेलो इंडियाचा आज नववा

दिवस असून आज दिवसभरात मुष्टियुद्ध, टेनिस आदी खेळांचे सामने होणार आहेत. तसंच कलरीपयट्टू आणि थांग हे दोन नव्यानं समाविष्ट केलेले खेळही आज खेळले जातील.

**<><><><>**

क्रिकेटपटू विराट कोहलीने आज कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. त्याने समाज माध्यमावर ही माहिती दिली आहे. विराटने आत्तापर्यंत १२३ सामन्यांमध्ये ४६ पूर्णांक ८५ शतांशच्या सरासरीनं ९ हजार २३० धावा केल्या आहेत. त्याच्या १४ वर्षांच्या कारकिर्दीत सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड आणि सुनील गावस्कर यांच्यानंतर विराट हा भारतासाठी सर्वाधिक धावा करणारा चौथा फलंदाज बनला. ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू ग्रेग चॅपल याच्यानंतर कसोटी कर्णधारपदाच्या पदार्पणात दुहेरी शतकं करणारा विराट कोहली दुसरा क्रिकेटपटू आहे. कोहलीच्या नेतृत्वाखाली २०१९ मध्ये भारतीय संघानं ऑस्ट्रेलियामध्ये पहिल्यांदा बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी मालिका जिंकली. भारतानं २०२४ चा टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर कोहलीनं आधीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या टी-२० प्रकारातून निवृत्ती घेतली होती.

**<><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात महाराष्ट्र आणि छत्तीसगड जिल्ह्याच्या सीमेवर पोलीस आणि नक्षलवाद्यांमधे आज चकमक झाली. या चकमकीत काही नक्षलवादी ठार आणि जखमी  झाल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. पोलिसांनी नक्षली शिबिरं उद्ध्वस्त केली असून त्यांच्याकडील बंदुका आणि अन्य साहित्य ताब्यात घेतलं आहे.

**<><><><>**

सहकार चळवळीचं सिंहावलोकन करुन त्या माध्यमातून ग्रामीण अर्थकारण अधिक प्रगतिशील करण्यासाठी आणि सामान्य शेतकऱ्यालाही यात जोडून घेण्यासाठी राज्यसरकार प्रयत्नशील असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. सहकाराचं सक्षमीकरण आणि शासनाचं धोरण या विषयावर आयोजित परिसंवादात ते आज बोलत होते.

**//<><><><><>//**